Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-3 | Issue-10 | April-2014 Available online at www.aygrt.isrj.net

स्वयंसहायता बचत गट - स्वरुप, □ार्य व दिशा.

दत्तात्रय आघाव

पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय
ता. पाटोदा जि. बीड.

सारांश - समाजातील महिलांना मानाचे स्थान प्राप्त करुन देण्यासाठी भारत आणि बांगला देशासारख्या राष्ट्रांनी स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातुन अतिशय महत्वाचे पाउल उचलल्यामुळे महिलांना विशेषत: ग्रामीण व मागास भागातील आणि कमी उत्पन्न असणा-या कुटूबातील महिलांना मानाने समाजामध्ये राहण्याची सुवर्ण संधी प्राप्त झालेली दिसुन येते. सद्य:परिस्थीतीत भारतामध्ये या स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातुन गरीब, मागास, होतकरु व गरजू महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतीक व राजकीय क्षेत्रात आपला ठसा उमटविण्याची संधी प्राप्त झाली. दारिद्रयात जिवन जगणा-या कुटूबांची परिस्थीती अतिशय दयनिय असल्याचे दिसुन येते. सर्व समाज खाजगी सावकारिच्या पाशात आडकल्याने गरिब कुटूंबांना आपला सामाजिक स्तर उंचविण्यामध्ये अडचणी निर्माण होत होत्या. या संकल्पनेचे जनक असलेल्या बांगला देशातील (२००६ मध्ये नोबेल पारितोषक प्राप्त) श्री मोहमंद युनूस यांनी बांगला देशातील जोबरा या गावात या संकल्पनेची सुरुवात केल्याचे दिसते.

प्रस्तावना-

जगामध्ये स्वयंसहायता बचत गटाची चळवळ बचत गट, समुह गट, महिला बचत गट, या वेगवेगळया संकल्पनेत साकार होत असल्याचे दिसून येते. या संकल्पनेच्या मुळात सक्षमीकरण हे मुख्य ध्येय असून जगभर ही चळवळ जोमाने विकसीत होत असल्याचे दिसून येते.

जागतीक पातळीवर मागास राष्ट्र म्हणुन गणल्या गेलेल्या बांगला देशात स्वयंसहायता बचत गटाच्या संकल्पनेची सुरुवात झाल्याचे दिसून येते. नोबल पारीतोषक विजेते डॉ. मोहमंद युनूस यांनी बांगला देशात स्वयंसहायता बचत गटाची मुहूर्त मेढ रोवण्याचे कार्य केलेले आहे. डॉ. मोहमंद युनूस हे चितगाव विद्यापीठामध्ये अर्थशास्त्र विषयाचे अध्यापनाचे कार्य करत होते. बांगला देशात १९७४ मध्ये पडलेल्या दुष्काळाच्या आपत्तीमुळे तेथील खेडयात भयानक दारिद्रय परिस्थिती निर्माण झाली होती. चितगांव विद्यापीठाच्या परिसरात असलेल्या जोबरा गावात भुमिहिन असलेल्या गावातील महिला जगण्यासाठी धडपडत असल्याचे निदर्शनास आले. सावकारी पाशात अडकलेल्या लोकांना कसलाही आर्थिक आधार नव्हता. म्हणुन डॉ. युनूस यांनी प्रायोगिक तत्वावर त्या गावातील ८० लोकांना स्वत:च्या खिशातुन कर्ज रुपाने पैसे दिले. कर्ज रुपाने दिलेले पैसे अत्यल्प होते. कोणतेही तारण न घेता दिलेले कर्ज संबधीत गरजु लोकांनी वेळेत परत केली. या वरुन डॉ. युनूस यांच्या लक्षात आले की गरजवंत लोकांना त्याच्या गरजे इतके पैसे कर्ज रुपाने दिले तर ते आपल्या गरजा पुर्ण करुन वेळेत दिलेल्या पैशाची परतफेड करतात. म्हणुन त्यांनी जोबरा गावात या योजनेची मुहर्तमेढ रोवल्याचे दिसुन येते त्यानंतर १९८३ मध्ये तेथे ग्रामीण बॅकेची स्थापना करण्यासाठी कायदा करण्यात आला. आणी या माध्यमातुन गरीब व्यक्ती कर्ज फेडीस लायक असतो. हे डॉ. महमंद युनूस यांनी जगाला सिध्द करुन दाखवले.

भारतामध्ये स्वंतत्र्यानंतर १९५१ पासून गरीबी निर्मुलनासाठी तसेच महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबविल्या गेल्या. परंतु या योजनांचे मुल्यमापन केल्यानंतर या बाबतीत जेवढे अपेक्षीत यश मिळावयास पाहिजे होते ते न मिळाल्यामुळे मुल्यमापन पातळीवर निराशाच पाहावयास मिळाली. म्हणुन त्या सर्व योजनांचे एकीकरण करुन १ एप्रिल १९९९ पासून स्वर्णजयंती ग्रामरोजगार योजनार्तगत स्वंयसहायता बचत गटांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न सूरू झाला. सातव्या योजनेच्या काळात स्वयंसहायता गट हे बचत करण्याचे व दारिद्रयात असणा-या सदस्याना कर्जासाठी मदत करणारे प्रभावी साधन मानले जावू लागले.

भारतामध्ये स्वयंसहायता बचत गटाची चळवळ मायराडा या संस्थेने १९८५ मध्ये सूरु केलेली दिसते. या गटाचे प्रणेते व जनक डॉ. महमंद युनीस यांनी भारताच्या निमंत्रणावरुन १९९० साली नेहरु विद्यापीठात स्वयंसहायता बचत गटाबाबत मार्गदर्शन केले. सन १९९२ मध्ये अशिया पॅसिफिक रुरल च्या आणि ॲग्रीकल्चरल क्रेडीट असोशियसनच्या साहाय्याने भारतामध्ये स्वयंसहायता बचत गट राबविण्यास सूरुवात झाली. त्यानंतर १९९३ मध्ये भारतीय रिझर्व बॅकेने हे गट राबविण्यास कायदेशिर मान्यता दिली. या चळवळीत महिलांचा सहभाग लक्षणीयरित्या वाढत गेल्यामुळे प्रादेशिक स्तरावर चळवळीचे संदर्भ बदलत गेल्याचे दिसते. काही भागात महिलांची चळवळ म्हणुन महिला बचत गट असे संदर्भ चळवळ फोफावत आहे. भारतामध्ये महाराष्ट्र, राजस्थान, तामीळनाडू केरळ ही राज्ये स्वयंसहायता गटाच्या संदर्भात आघाडीवर आहेत. तसेच मायराडा संस्थेच्या निष्कार्षाची परिनिती म्हणुन पद्मश्री जया अरुणाचलम यांनी नार्बाडच्या माध्यमातुन आंध्रप्रदेश, तामिळनाडु, अरुणाचलम राज्यात महिला बचत गट सुरु केले.

सन १९९२ मध्ये नाबार्डने ५०० स्वयंसहायता गटांना बॅकेशी जोडण्याचा पथदर्शी प्रकल्प सुरु केला. तसेच रिझर्व बॅकेने स्वयंसहायता बचत गटांना वित्तासाठी मार्गदर्शक तत्वे वितरित करुन १९९६ मध्ये स्वयंसहायता बचत गटांना बॅक संलग्नतासाठी बॅकींग क्षेत्राच्या प्राध्याण्यक्रम कर्जाच्या क्षेत्रात समावेश केला. अशा पध्दतीने स्वयंसहायता बचत गटाची सूरुवात भारतामध्ये झाल्याचे दिसून येते.

भारतातील इतर राज्याप्रमाणेच महाराष्ट्रातही या चळवळीने चांगली गती घेतलेली दिसून येते. महाराष्ट्र राज्य हे भारतामध्ये पूरोगामी विचारंच राज्य मानले जाते. तसेच महिला धोरणाचे मार्गदर्शन करणारे भारतातील एक अग्रगण्य राज्य गणले जाते. महाराष्ट्राने महिला धोरणाचा पूरस्कार करुन या महिला धोरणात स्वयंसहायता गटाला प्राध्यान्य दिलेले आहे. स्वयंसहायता महिला बचत गट बांगला देशाच्या धर्तीवर महाराष्ट्रातील सर्व जिल्हयामध्ये सूरु केलेले आहेत. महाराष्ट्रामध्ये ग्रामीण विकासाबरोबरच महिलांचा विकासात सहभाग वाढविण्यासाठी १९९४ मध्ये सर्वकंष महिला धोरण जाहीर करुन महिला सबलीकरणासाठी स्वयंसहायता गटाची संकल्पना स्पष्ट करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात स्वयंसहायता गटाची संकल्पना नवीन नाही. आजच्या बचत गटाची पार्श्वभूमी महाराष्ट्रात १९७० पासून तयार झाल्याचे दिसून येते. कारण १९७७ मध्ये इलाबेन भट यांनी महिला व सुक्ष्म वित्तपुरवठा या विषयाची मांडणी केली होती तसेच १९८४-८५ मध्ये गडचिरोली मधील वडसा तालुक्यात गट सूरु झाल्याचे आढळते १९८८ नंतर मात्र बचत गटांनी चळवळीचे रुप धारण केल्याचे दिसते.

महाराष्ट्रात १९९४ मध्ये केंद्रसरकार व आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीच्या सहाय्याने महाराष्ट्र ग्रामीण पत पुरवठा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर चार जिल्हयात राबविण्यात आला या योजनेत महिला विकासाचा समावेश करुन तो राबविण्याची जबाबदारी महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपविण्यात आली याच कार्यक्रमांतर्गत महिला मंडळ, महिला बाल व ग्रामीण विकास मंडळ या स्वयसेवी संस्थचा मोलाचा सहभाग असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रामध्ये बचत गटांच्या अर्थिक चळवळीला सामाजिक उपक्रमाची जोड आहे हे महाराष्ट्राचे वैशिष्ठे मानले जाते. महाराष्ट्रात या चळवळीत बॅका व स्वयंसेवी संस्थाचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे दिसते. स्वयसेवी संस्थेद्वारे स्वयंसहायता गट चळवळीला योग्य दिशा देण्याचे, सहभागीदारांच्या क्षमता वाढीसाठी प्रभावी प्रशिक्षण देण्याचे काम करीत आहेत त्यामुळे महाराष्ट्रात स्वयंसहायता समुह चळवळ सर्व भागात फोफावत आहे.

महाराष्ट्रामध्ये सन १९७० च्या दशकापासुन स्वंय सहायता बचत गट चळवळ सुरु असली तरी १९९३ मध्ये ग्रामीण पतपुरवठा योजनांतर्गत हेतुपुरस्पर चालना देण्यात आली. त्याचप्रमाणे १९९६ मध्ये स्वर्ण जयंती ग्राम स्वयरोजगारांतर्गत दारिद्रय नि-र्मुल-नासाठी ग्रामिण भागात स्वयं सहायता बचत गटाची अनुदान तत्वावर जोमाने सुरुवात झाली. या चळवळीत महाराष्ट्रात ४३७० बॅक शाखा आहेत. महाराष्ट्रात स्वयसंहायता बचत गटाच्या चळवळीत चंद्रपुर जिल्हा प्रथम □मांकावर आहे. आजच्या वर्तमान परिस्थिती महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात या स्वंय सहायता गटाची व्याप्ती भरपुर प्रमाणात वाढलेली दिसुन येते.

स्वरुप :- स्वयहाय्यता बचत गटाची सुरुवात व उगम कसा व □ोठे झाला ही पार्श्वभुमी पाहिल्यानंतर स्वंयसहायता बचत गट म्हणजे काय त्याचे स्वरुप काय, त्याची कार्य कोणती, त्यांचे उद्येश काय, त्यांचे लाभार्थी कोण या सर्व बाबींचा अभ्यास केल्याशिवाय स्वयंसहाय्यता बचत गटांचे महत्व व त्या चळवळीचे फायदे कोणते हे लक्षात येणार नाही.

स्वयंसहायता बचत गटांची निर्मीती किंवा स्थापना करण्यासाठी सर्वसाधारणपणे १५ ते २० लोंकाचा किंवा महिलांचा अनौपचारिक समुह एकत्र येणे आवश्यक असते. तो समुह किंवा तो गट निश्चीत स्वरुपाचे उदिष्ट घेऊन स्वइच्छेने एकत्र आला तर त्यास स्वयंसहाय्यता बचत गट असे म्हणता येईल. त्याच प्रमाणे एकाच कारणसाठी गटातील लोंकाची उन्नती, विकास व फायद्यासाठी एकत्रित आलेला समुह म्हणजे बचत गट असे ही म्हटले जाते. या बचत गटातील प्रत्येक सभासद समान रक्कम ठरावीक कालावधीत बचत म्हणुन एकत्रित करतात. व त्याचा उपयोग सभासदांच्या आर्थिक गरजा

भागविण्या करता लोकशाही मार्गाने करतात. त्याला स्वय सहायता बचत गट असे म्हणतात स्वंय सहायता बचत गट ही कोणतीही शासकीय योजना अथवा गट प्रकल्प नसुन महिलांना व युवकांना संघटीत करण्यासाठी त्यांना विकासात्मक स्वरुपाचे शिक्षण देण्यासाठीचे माध्यम म्हणजे स्वयसहायता बचत गट होय.

स्वयं सहायता या शब्दाचा प्रत्येक अक्षरापासुन स्वयं सहाय्यता बचत गटाच्या कार्यकक्षाबाबत अर्थ बोध होते.

स्व - स्वताहाच्या बचतीवर सुरु केलेला.

य - यातना दुर करणारा

स - सर्वानुमते निर्णय घेतले जाणारा

हा - हाकेला मदत करणारा

य - यश मिळवुन दे□ारा

ता - ताकद वाढविणारा

असा अर्थ या स्वयं सहायता गटाच्या नावाचा काढला जातो. म्हणजेच स्वतःची मदत स्वःताच करणे इतर कोणाच्या मदतीवर अवलंबुन न राहणे, कुटुंब चालवत असताना होणा-या यातना किंवा होणारे कष्ठ स्वःताच दुर करणे, या गटाचे व्यवस्थापन लोकशाही पध्दतीने करुन सर्व निर्णय सर्वानुमते घेणे, अडचणीच्या काळात चटकन धावुन येणे, हाती घेतलेल्या कामात हमखास यश मिळवुन देणे आणि या माध्यमातुन त्या गटातील प्रत्ये□ व्यक्तिची ताकद व क्षमता वाढविणे म्हणजे स्वयंसहायता बचत गट अशी व्याख्या केल्यास वावगे ठरु नये.

स्वयं सहाय्यता बचत गटाचे उद्येश :- गरीब, दारिद्रय रेषेखालील व वंचित घटाकातील लोकांची पिळवणुक थांबावी व त्यांना समाजात ताठ मानाने जगता यावे. या उद्येशाने ही स्वयं सहाय्यता बचत गटांची चळवळ वाढलेली दिसुन येते.

- सावकारांच्या पाशात अडकावे लागु नये व प्रत्येक माणसाला बचतीची सवय लागावी हा बचत गट स्थापन करण्यामागचा प्राथमिक हेतु असल्याचे दिसते.
- सदस्यांनी दैनेदिन स्वरुपात काही बचत करायची आणि अडीअडचणीना या एकत्रीत बचतीतुन कर्ज घ्यायचे ही स्वयं सहाय्यता बचत गट स्थापणे मागची मुळ संकल्पना असल्याचे दिसते.
- स्वयं सहाय्यता बचत गटातील महिलांचे मानसिक व वैचारिक परिवर्तन घडवुन आणुन त्यांना स्वःबळावर उभे राहण्यास मदत करणे हा ही एक उद्येश असल्याचे दिसते.
- दारिद्रय रेषेखालील गरिब महिलांच्या विकासासाठी १० किंवा २० पर्यंत महिला एकत्र येऊन बचत गट स्थापन करुन बचतीला प्रोत्साहन देणे व अडीअडचणींना गरजु महिलांना छोटे कर्ज मिळवुन देणे. अशा प्रकारचे हेतु व उद्येश समोर ठेवुन स्वयं सहाय्यता बचत गटाची स्थापना केली जाते.

स्वयं सहाय्यता बचत गटाची वैशिष्टे :- स्वयं सहाय्यता बचत गटाच्या माध्यमातुन ज्या महिला, वंचीत मागासवर्गीय आदिवासी महिलांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय विकास मोठया द्रुत्तगतिने होतो आहे. अशा स्वयं सहायता बचत गटांची काही वैशिष्टे ही मांडता येतील.

- **□ार्यपध्दती -** या बचत गटांची काम करण्याची पध्दती अतिशय पारदर्शक स्वरुपाची असते. गटाच्या दरमहा मासीक बैठकीमध्ये महिन्याचे नियोजन करुन त्यानुसार कार्य केले जाते व महिना भरात केलेल्या कामाच्या आढावा पूढील बैठकीत ठेवला जातो.
- **□ारभार -** या बचत गटाच्या कारभार लोकशाही पध्दतीने केला जातो. सर्वाना विश्वासात घेऊन बचत गटाची सर्व निर्णय व कार्यवाही केली जाते.
- **सभासदत्व -** स्वंय सहाय्यता बचत गटाचे सभासदत्व हे ऐच्छीक स्वरुपाचे असून प्रत्यक सदस्य हे सभासदत्व स्वइच्छेने स्वीकारतो. कोणावरही बळजबरीने सभासदत्व लादले जात नाही.
- **व्यवहार -** स्वयं सहायता बचत गटाचा सर्व व्यवहार सर्वासमोर अतिशय पारदर्शक रितीने पार पाडला जातो.
- **सह□ार्य -** शासन, बॅका, संस्था इत्यादी संस्थाच्या सहकार्याने स्वयं सहाय्यता बचत गटाचा कारभार व व्यवहार चालावला जातो. त्याचप्रमाणे बचत गटातील सर्व सदस्यांचे सहकार्य घेऊनच कारभार चालवला जातो.

- **आर्थिक व्यवहार -** बचत गटामार्फत जे आर्थिक देव घेव चे व्यवहार केले जातात. त्याच्या सर्व लेखी नोंदी ठेवल्या जातात.
  वरील प्रमाणे स्वयं सहाय्यता बचत गटाचे वैशिष्टे सांगता येतील.

  बचत गट स्थापन करण्याची पध्दत - खाली दिलेल्या स्टेप्स (पाय-या) प्रमाणे बचत गटाची स्थापना केली जाते.

१. बचत गट स्थापन करण्यासाठी कार्यक्षेत्राची निवड करणे.
२. सर्वे□□ □र□.
३. महिलांचा शोघ घेणे उदा. गरीब, गरजु, दारिद्रयरेषेखालील महिला .
४. बचत गट संकल्पनेची पूर्ण माहिती देणे.
५. इच्छुक महिलांची यादी तयार करणे.
६. बचत गटाची वातावरण निर्मीती करणे.
७. सर्वानुमते पात्र गट प्रमुखची निवड करणे. इ
८. बचत गटाचे नियम ठरवणे.
९. सभासद संघटिका यांचे प्रशिक्षण आयोजित करणे.
१०. □टाचे कामकाज दरमहा बैठकीतच करण्यात यावे.
११. दरवर्षी गटाच्या कामकाजाचा आढावा घेणे व नियोजन करणे. वरील प्रमाणे बचत गट स्थापण्याच्या पाय-या किंवा स्टेप्स सागता येतील.

स्वयं सहाय्यता बचत गटासाठी नियमावली तयार केली जाते. ती पुढील प्रमाणे मांडता येईल.

१. दरवर्षी □टप्रमुख बदलण्यात यावा.
२. पासबुकात सभासदाने खाडाखोड करु नये.
३. स्वत पास बुक लिहु नये.
४. सर्वाची बचत समान असावी.
५. बचत गटाच्या नावाने बॅकेज बचत खाते उघडण्यात यावे.
६. दरमहा भरलेले जमाखर्च पूस्तक व इतर रेकार्ड तपासुन पहावे .
७. ठराविक सभासदांनाच कर्ज देण्यात येवु नये वरिल प्रमाणे बचत गटाचे व्यवस्थापण सुरळीत चालव□यासाठी नियमावली तयार केली जाते व त्यानुसारच सर्व कारभार बचत गटांचा चालतो.

स्वयं सहाय्यता बचत गटांचे व्यवस्थापन :- बचत गट स्थापन केल्यानंतर गटातील सदस्यांना अडचणीच्या वेळी केलेल्या बचतीतुन कर्ज दिली जाते. ते कर्ज देत असतांना काही नियमांचे पालन करुन कर्ज वितरित केले जाते.

१. कर्ज गटाबाहेरील व्यक्तिस देत नाहीत.
२. सर्व रक्कम एकाच सदस्यास देत नाहीत.
३. कर्जाच्या रक्कमेची गरज किती हे बघतले जाते.
४. सर्व सदस्यांना समान कर्ज दिले जात नाही गरजेनुसार कर्ज दिले जाते.
५. दिलेल्या कर्जावर सर्व सदस्यांना समान व्याजदर आकारला जातो.
६. दिलेल्या कर्जाच्या परतफेडीचे अल्पमुदतीचे वेळापत्रक तयार केले जाते.
७. सभासदांना कर्ज वितरण केल्याच्या व सभासदांनी कर्जाची परत फेड केल्याच्या नोंदी नोंदवहीत करणे अत्यावश्यक असते.

८. स्वयं सहायता गटाची कर्जासंबंधी बॅकेशी संलग्नता (लिंकेज) असले पाहिजे वरील प्रमाणे बचत. गटातील सभासदांना कर्ज वितरीत करताना या नियमांचे पालन कटाक्षाने केले जाते.

स्वयं सहाय्यता गटाची कामे :- बचत गट स्थापन झाल्यानंतर कोणती कामे करावी लागतात. याबाबत थोडक्यात असे म्हणता येईल की

१. सर्व प्रथम गटातील प्रत्येक व्यक्तींनी ठराविक रक्कम बचत म्हणुन प्रत्येक बैठकीच्या वेळी जमा करावी .
२. बचत गटाचा कारभार व्यवस्थीतपणे पार पाडण्यासाठी लोकशाही पध्दतीने २-३ नेत्याची निवड करावी.
३. बचत गटाच्या मासिक किंवा पाक्षीक बैठका नियमीतपणे आयोजीत करणे.
४. बचत गटाच्या बैठकीची हजेरी पूस्तके इतिवृंताची नोंदवही नियमीत ठेवणे.
५. पैशाच्या जावकाची पारदर्शकपणे नोंद ठेवणे.
६. सदस्याच्या दैनदिन गरजा व उत्पादन करण्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे.
७. बचत गटातील सदस्यांच्या सबलीकरणासाठी व कार्यकुशलता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवि□.
८. बचत गटाच्या नेतृत्वामध्ये आळीपाळीणे नेतृत्व रचना करणे इत्यादी कामे बचत गटाकडुन पार पाडली जातात.

स्वयं सहाय्यता बचत गटांनी ग्रामविकासात व महिलांच्या सक्षमीकरणात केलेली कामगिरी अतिशय उत्साह वर्धक व चांगल्या प्रकारची दिसून येते. बचत गटामुळे ग्रामीण भागातील महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन धाडशी असल्याचे चित्र आज समाजात पहावयास मिळते. बचत गटाच्या माध्यमातुन एकत्र आल्यामुळे एकमेकांचे दु:ख □ाय आहेत याची जाणीव झाली. व त्या दुखात सहभागी होता आले. बचत गटातील महिलांचा आत्मविश्वास वाढल्यामुळे आन्याया विरुध्द लढण्याची ताकत त्याच्यात निर्माण झाली व दारुबंदी सार□ी □ामे या महिला बचत गटामार्फत राबवुन अनेक ठिकाणी संपूर्णपणे दारुबंदी केल्याचे दिसते या बचत गटांनी श्रमाला महत्व देवुन श्रमदानाने कोणतेही मोठे काम सहजगत्या होऊ शकते हे ही दाखवुन दिले. रस्त्यासारखी कामे बचत गटांनी श्रमदानाने पार पाडली. एकीचे बळ किती असते हे ही या बचत गटाच्या माध्यमातुन निदर्शनास आले. बचत गटांच्या सर्व सदस्यांनी एकत्र येवुन ज्या ठिकाणी एस. टी. बसेसची सोय नव्हती तेथे एस. टी. सूरु करण्यास भाग पाडले. बचत गट आरोग्याच्या बाबतीत मागे नसल्याचे दिसून येते. या गटा मार्फत आर्थिक बाबींची सोडवणुक आपल्या गावातच करता येऊ शकली स्त्रीयांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा. मुलींना शिक्षण द्यावे याबाबत जनजागृती या गटामार्फत केली जाते. समाजातील वाइट चालीरीती व परंपरा मोडुन काढत विकासाला हातभर लावण्याचे कार्य या बचत गटाकडुन होताना दिसते.

महिलामध्ये स्वंय रोजगाराची गोडी निर्माण करण्याचे काम या बचत गटामार्फत केल्याचे दिसते आपल्या समाजामध्ये स्त्रिया चूल आणि मूल या संकल्पनेत वावरत होत्या त्यांना घराबाहेर येवुन स्वत:हाच्या पायावर उभे राहण्यासाठी स्वयंरोजगार करण्याची गोडी निर्माण करुन दिली या बचत गटामुळे बॅकेशी व बॅकेच्या कार्य पध्दती ची ओळख महिलांना झाली त्यामुळे बॅकेत जाऊन बचत खाते उघडयापासुन ते गरजेसाठी कर्ज उपलब्धते पर्यंतची माहिती महिलांना या बचत गटामुळे झालेली दिसुन येते. अशा प्रकारची कामगिरी या बचत गटामार्फत झाल्याचे अभ्यासाअंती लक्षात येते.

स्वयं सहाय्यता बचत गटामुळे व त्याच्या कार्य प्रणालीमुळे अनेक फायदे होताना दिसतात.

१. बचत गटामुळे संघटन होऊन बचत व काटकसरीची सवय लागते.
२. बचत गटामुळे अडीअडचणीच्या वेळेस तातडीच्या गरजा भागविण्यासाठी सावकराकडुन कर्ज घ्यावे लागत नाही .
३. बचत गटामुळे त्वरीत व सूलभरित्या कर्ज पूरवठा होतो व सभासदांना बचतीची सवय लागते आणि बॅकेचे व्यवहार माहिती होतात.
४. सावकारी कर्जाच्या तूलनेत अत्यंत कमी व्याज दरात आर्थिक सहाय्य उपलब्ध होते. त्यामुळे सदस्यांच्या एकमेकांच्या अडचणी सोडविल्या जातात.
५. बचत गटामुळे सभासदामध्ये परस्पर सहकार्य व विश्वास निर्माण होतो.
६. बचत गटामुळे सभासदांना अतर्गत कर्ज पूरवठा अल्प व्याजदराने होतो.
७. बचत गटामुळे महिला घराबाहेर पडुन त्यांना नवीन बाबी शिकण्याची संधी मिळते.
८. बचत गटामूळे महिला स्वावलंबी बनू लागल्या.
९. बचत गटामुळे बचत करणे कर्ज घेणे परतफेड करणे अशा अर्थिक व्यवहाराची माहिती होते व त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो .

१०. बचत गटामुळे महिलांना सरकारच्या लोककल्याणच्या विविध योजनांची माहिती होते .
११. बचत गटामुळे महिलांना समाजात स्वतःचे स्थान निर्माण करता येते.
१२. बचत गटामुळे महिलांना बचतीची सवय लागते .
१३. कार्यरत असलेल्या बचत गटास एक वर्षानंतर प्रती सभासद १००० व जास्तीत जास्त २५००० पर्यंत व्यवसायासाठी खेळते भांडवल दिले जाते.
१४. दारिद्रयरेषेखालील बचत गटास व्यवसायासाठी रु १.२५ लाख किंवा ५०% यापैकी कमी असेल त्या रक्कमेएवढे अनूदान मिळते.

स्वयं सहाय्यता बचत गटाची महाराष्ट्रातील चळवळ :- सन १९९२ मध्ये राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बॅकेने (नाबार्ड) पूढाकार घेऊन सूरु केलेल्या स्वयंसहाय्यता समूह बॅक संलंग्नता कार्यक्रमाने आता राज्यात चांगलीच प्रगती केलेली आहे. महाराष्ट्र राज्यात एक ला□हुन अधिक बचत गटांच्या माध्यमातुन सूमारे २६७ कोटी रुपयांच्या पतपुरवठा सामान्य नागरीकांना करण्यात आला. राज्यात चंद्रपुर जिल्हयात सर्वाधिक म्हणजे १८००० बचत गट स्थापन झालेले आहेत तसेच राष्ट्रीयकृत बॅकामध्ये सूध्दा आता बचत गट जोडण्याची स्पर्धा सूरु झालेली आहे त्याचप्रमाणे स्टेट बॅक ऑफ इंडिया बचत गट स्थापनेत अग्रेसर असुन आतापर्यंत त्यानी ४६००० बचत गट जोडले आहेत. त्यापाठोपाठ बॅक ऑफ महारास्ट्राने २४००० बचत गट जोडले आहेत बॅकाकडुन ८.५% दराने कर्ज पुरवठा केला जातो. बचत गटांना दिलेल्या कर्जाची १००% वसुली होऊ लागल्याने बॅकांचा बचत गटाकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. बॅकाकडुन बचत गटांना बचतीच्या चार पट कर्ज व सदस्यांना प्रशिक्षण देण्यात येते दिलेले कर्ज हमखास वसुल होण्याची खात्री असल्याने राज्यातील बचत गटांचे महत्व आता राष्ट्रीयकृत बॅकांना वाटु लागल्याचे चित्र आज भारत देश आणि महाराष्ट्र राज्यामध्ये पहावयास मिळते ग्रामीण आदीवासी व अशिक्षीत महिलांच्या सक्षमीकरणासाठी व सबलीकरणासाठी स्वय सहाय्यता बचत गटांचे कार्य अतिशय उल्लेखनिय असल्याचे दिसुन येते काही ठिकाणी जरी स्वयं सहाय्यता बचत गटाच्या नावावर क्षमते प्रमाणे व नियमाप्रमाणे कार्यवाही होत नसली तरी असे काही अपवाद वगळता खरोखरच महिला बचत गटाच्या माध्यमातुन समाजातील विषमता दूर करण्याचा रास्त प्रयत्न होतना दिसतो आहे.

संदर्भ :-

१. अल्पबचत नियोजन - प्रा. डॉ. एम.यू. मूलानी २. महिला बचत गट - मा□दर्शि□ा सं□ल□ व संपादन - राजेश चौधरी ३. Selfhelp Group Internet Folder Maha Govt. website